**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

ऑफि.जन.१/ २०२३–२४/१९४०

१० एप्रिल, २०२३.

**परिपत्रक**

**सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्या अवलोकनार्थ व पुढील आवश्यक कार्यवाही करीता सादर.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिताची नैसर्गिक विस्ताराची फी विद्यापीठाकडे जमा केलेली नसल्याबाबत.**

**संदर्भ :१. ऑफि.जन/फॉरमॅट/२०२२–२३/२०५१ दिनांक १६ सप्टेंबर, २०२२**

**२. ऑफि.जन/२०२२–२३/२५५२ दिनांक १७ डिसेंबर, २०२२**

सोबत जोडलेल्या यादीतील संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांना सुचीत करण्यात येते की, संलग्नता विभागाने उपरोक्त विषयी, संदर्भाकीत पकरपत्रकाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीताचे **नैसर्गिक विस्ताराचे शुल्क ऑनलाईन** प्रणालीव्दारे विद्यापीठाकडे जमा करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते.

संलग्नता विभागाच्या नोंदीनुसार सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालय प्रशासनाने शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीताचा नैसर्गिक विस्तार मिळणेबाबतचा अर्ज व नैसर्गिक विस्ताराचे शुल्क आजपर्यंत जमा केलेले नाही. सदर विषयी ईमेल/फोन व्दारे महाविद्यालयातील प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्याशी संपर्क केलेला असून देखील महाविद्यालयाव्दारे कार्यवाही प्रलंबित आहे.

विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता **"स्थानिक चौकशी समिती"** गठीत केली असून, संलग्नता प्रदान करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

आपला शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीताचा **नैसर्गिक विस्तार** बाबतचा अर्ज व शुल्क प्राप्त न झाल्याने आपल्या महाविद्यालयाची भेट प्रलंबित ठेवण्यात येणार आहे. महाविद्यालयाने दिनांक २०/४/२३ पर्यंत आवश्यक अर्ज व नैसर्गिक विस्ताराचे शुल्क **ऑनलाईन प्रणालीव्दारे** सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष **२०२३–२४** चे संलग्नीकरण पत्र देण्यात येणार नाही तसेच महाविद्यालयाचे संलग्नीकरण रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

याविषयी अधिकच्या माहितीकरीता संलग्नता विभाग, मुंबई यांच्याशी ईमेल affiliation@sndt.ac.in किंवा ०२२–२२०९१५७७ या फोनव्दारे कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

(प्रो. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवताविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत: १.प्र–कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२.कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३.महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल), एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू
४.संचालक,परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ (अति.भार), एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू, मुंबई